स्थापना १९५८

वर्षे ६८ वे

**The Thane District Central Co-op.Bank Ltd., Thane.**
दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे.
छत्रपती शिवाजी पथ, ठाणे. (पो.बॉ.न.१९).
Reg.No.24917 Date 14th March, 1958. Email id:- support@thanedccbank.com

# नोकरभरतीची विस्तृत जाहिरात

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेले **ज्यु.बँकिंग असिस्टंट या श्रेणीतील १२३, शिपाई श्रेणीची ३६, सुरक्षारक्षक ५, वाहनचालक १ असे एकूण १६५ रिक्त पदे** सरळसेवा पध्दतीने भरणेसाठी दिनांक १७/०८/२०२५ रोजीच्या **दैनिक सकाळ व ठाणे वैभव** या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरणेकरीता बँकेस निवड सुची तयार करावयाची आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या www.thanedistrictbank.com किंवा www.thanedccbank.com या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहे.

**परिविक्षाधीन कालावधीतील वेतन :-**

- ज्यु.बँकिंग असिस्टंट श्रेणी:- परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.२०,०००/- एकत्रित वेतन अदा करणेत येईल.
- शिपाई श्रेणी :- परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.१५,०००/- एकत्रित वेतन अदा करणेत येईल.
- वॉचमन श्रेणी :- परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.१५,०००/- एकत्रित वेतन अदा करणेत येईल.
- वाहनचालक श्रेणी:- परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये दरमहा रू.१५,०००/- एकत्रित वेतन अदा करणेत येईल.

| अ.क्र | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर अर्ज भरणे | दि.१८/०८/२०२५ ते दि.२९/०८/२०२५ रोजी साय.५.०० वाजेपर्यंत |
| २. | ऑनलाईन परिक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.२९/०८/२०२५ रोजी सांय.५.०० वाजेपर्यंत. |
| ३. | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याची दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५. | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर अलहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |

**सूचना :-**

१. ऑनलाईन परिक्षा शुल्क भरणा केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.
२. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरणा करता येईल.
३. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा ईमेल-आयडी, मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे. उमेदवाराला एका पदासाठी एकच अर्ज भरता येणार आहे. **एकदा ऑनलाईनद्वारे अपलोड केलेल्या अर्जात पुनश्च: दुरूस्ती करता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**
४. उमेदवारांने अर्ज भरतांना ज्या पदासाठी तो अर्ज करीत आहे, त्या पदासाठी आवश्यक असणारी पात्रता धारण करीत असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. अपात्र अर्जाबाबत अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

५. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान वरील दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

६. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरतेवेळी तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास **+९१-९१५६०३२५९८** हा हेल्पलाईन क्रमांक आहे. हेल्पलाईनवर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत) संपर्क करावा. अर्ज भरण्यास अडचण निर्माण झाल्यास support@thanedccbank.com या मेल आयडीवर ई-मेल द्वारे संपर्क साधावा. वरील हेल्पलाईन क्रमांक व मेल आयडी फक्त काही तांत्रिक अडचणी (अर्ज भरतेवेळी, मुलाखतपत्र डाउनलोड करतेवेळी इ.) निर्माण झाल्यास संपर्काकरिता आहे.

७. रिक्त पदांची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदे वाढल्यास उपलब्ध निवड यादीतून पात्र ठरलेल्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारातून सदरची रिक्त पदे भरण्यात येतील. याबाबतचे सर्व अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. तसेच सदर भरतीप्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

८. विवाहीत महिला उमेदवारांच्या नावात बदल केला असल्यास त्याप्रमाणे नाव बदल्याचे राजपत्र व विवाह नोंदणी दाखला ऑनलाईन परिक्षेवेळी व कागदपत्र पडताळणीवेळी सोबत असणे बंधनकारक आहे.

९. उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव दि.१८/०८/२०२५ या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे. **मुळ कागदपत्र पडताळणीवेळी उमेदवारांचे प्रोव्हीजनल प्रमाणपत्र** (Provisonal Certificate) **ग्राहय धरले जाणार नाहीत.**

विविध श्रेणीतील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज विहीत नमुन्यात सादर करण्यासाठीची पात्रता, निकष व इतर तपशिल खालील प्रमाणे.

**अ. शैक्षणिक अर्हता :-**

| पदाचे नांव | पदसंख्या | वयोवर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता. |
|---|---|---|---|
| ज्यु.बँकिंग असिस्टंट | १२३ | २१ ते३८ वर्षे | शैक्षणिक पात्रता- उमेदवार शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाचा किमान ५० % गुण मिळवून उत्तीर्ण असावा. अथवा समकक्ष श्रेणी (equivalent) धारण करून उत्तीर्ण असावा. उमेदवारास संगणकीय ज्ञान असणे आवश्यक राहील. यासाठी उमेदवाराने शासन मान्य संस्थेतुन MSCIT हा संगणक कोर्स उत्तीर्ण केला असला पाहीजे.<br>• अथवा महाराष्ट्र शासन निर्णय मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.०४ फेब्रुवारी, २०१३ नूसार माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामधील पदविका/ पदवी/प्रमाणपत्र धारक.<br>• शासन पुरकपत्र, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग, क्र.मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ नूसार पदवीधारक / प्रमाणपत्र धारक<br>• शासन पुरकपत्र, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग, क्र.मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक १६ जुलै, २०१८ नूसार प्रमाणपत्रधारक अथवा या परीपत्रकास अनुसरून शासनाकडील अद्यायावत पुरक परिपत्रक असल्यास ते गृहीत धरण्यात येईल.<br>• ज्यु.बँकिंग असिस्टंट पदाच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये Diploma in Computer Engineering, Diploma in information Technology, Diploma in Computer Science & Application, B.Sc in Computer Science, Bachelor of computer Science, B.Sc. in information Technology, Bachelor of computer Applications, B.E/ B. Tech in computer engineering, B.E/ B. Tech in Electronics & Telecommunication Engineering, B.E/ B. Tech in information |

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Technology. इ. असल्यास त्यास MSCIT व तत्सम अर्हतेची आवश्यकता नसेल. |
| शिपाई | ३६ | १८ ते ३८ वर्षे | उमेदवार ८ वी उत्तीर्ण ते १२ वी उत्तीर्ण पर्यंतचेच शिक्षण ग्राहय धरणेत येईल. |
| सुरक्षारक्षक | ५ | १८ ते ३८ वर्षे | उमेदवार ८ वी उत्तीर्ण ते १२ वी उत्तीर्ण पर्यंतचेच शिक्षण ग्राहय धरणेत येईल. |
| वाहन चालक | १ | १८ ते ३८ वर्षे | उमेदवार ८ वी उत्तीर्ण ते १२ वी उत्तीर्ण पर्यंतचेच शिक्षण ग्राहय धरणेत येईल. वाहनचालक पदासाठी उमेदवाराकडे चारचाकी वाहन (LMV) परवाना असणे आवश्यक येईल. |

**टिप:- वरील पदांकरीता विहीत वयोमर्यादा दि.१८/०८/२०२५ रोजी पर्यंत पुर्ण असावी.**

**ब) निवड कार्यपध्दती:-**

**१. ऑनलाईन परिक्षा:-**

नोकरभरतीच्या पदांकरीता ऑनलाईन परिक्षा घेण्यांत येईल. सदर ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. गणित, बँकींग व सहकार, सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, भूगोल, इतिहास, मराठी, संगणक व माहिती तंत्रज्ञान, बुध्दीमापन चाचणी इ. तसेच ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल. नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा तांत्रिक कारणामुळे, अन्य कारणामुळे विहीत दिनांकास ऑनलाईन परिक्षा घेणे शक्य नसेल तर अन्य सोईच्या दिवशी ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

**२. कागदपत्र पडताळणी व मुलाखत:-**

ऑनलाईन परिक्षेत गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पदसंख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस मुलाखतीपूर्वी व इतर संबधित मुळ प्रमाणपत्राची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील व मुलाखतीस ऑनलाईन पध्दतीने मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास support@thanedccbank.com या इमेल-आयडीवर ई-मेलद्वारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल. कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवारांना मुदतवाढ दिली जाणार नाही. कागदपत्रे पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवडप्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.

**३. मुलाखत:-**

मुलाखत पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणा-या उमेदवारांची बँक गठीत समितीकडून मुलाखत घेणेत येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत १० गुणांची असुन सदर गुणांचे भारांकन बँक धोरणानुसार असेल त्यामध्ये १० पैकी ५गुण संबंधित उमेदवारांच्या खालील शैक्षणिक पात्रता/ अनुभव यानुसार देण्यात येतील व उर्वरीत ५ गुण मौखीक मुलाखतीस देणेत येतील.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १. | कोणत्याही शाखेची पदवी | १ |
| २. | पदव्युत्तर पदवी | १ |
| ३. | CAIIB/JAIIB/GDC & A/ DCM | १ |
| ४. | अनुभव | २ |
| | **एकूण गुण** | ५ |

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

४. **उमेदवारांची अंतिम निवड यादी:-**

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे गुणांसह अंतिम निवडसुची व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे त्या श्रेणीतील पदसंख्या विचारात घेऊन अंतिम निवडसुची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणा-या उमेदवारांमध्ये **१) ठाणे व पालघर जिल्हातील उमेदवार २) धारण करीता असलेली उच्च/ शैक्षणिक अर्हता ३) अनुभव ४) वयाची सेवाजेष्ठता ५) आडनावाच्या इंग्रजी अक्षरानुसार** याक्रमाने प्राधान्य देवून अनुक्रमे उमेदवारांची यादी मर्यादीत करण्यात येईल. त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे/ गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.

५. **परिविक्षाधीन कालावधी: (Probation Period)**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षाधीन (हंगामी) कालावधी १ वर्षाचा राहील. परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये उमेदवाराची सेवा असमाधानकारक असल्यास सदर उमेदवारास सेवेत कायम करणे वा न करणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

६. **परिक्षा शुल्क :-** परिक्षा शुल्क हे नापरतावा (Non Refundable) राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही. **परिक्षा शुल्क ऑनलाईन पेमेंट मोडद्वारे भरावयाचे आहे. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.** शुल्क भरण्याची अंतिम तारीख २९/०८/२०२५ रोजी पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील याची नोंद घ्यावी. परिक्षा शुल्क ऑनलाईन पेमेंटमोडद्वारे (Online Payment Mode) भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

| श्रेणी | परिक्षा शुल्क | जीएसटी १८ % | एकूण |
|---|---|---|---|
| ज्यु.बँकींग असिस्टंट | रू.८००.०० | रू.१४४.०० | रू.९४४.०० |
| शिपाई | रू.५००.०० | रू.९०.०० | रू.५९०.०० |
| सुरक्षारक्षक | रू.५००.०० | रू.९०.०० | रू.५९०.०० |
| वाहन चालक | रू.५००.०० | रू.९०.०० | रू.५९०.०० |

**क) ऑनलाईन परिक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना.**

१. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो पदासाठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे ऑनलाईन परीक्षेस/ कागदपत्र पडताळणीस हजर राहणेचा /नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

४. उमेदवारांनी भरती प्रक्रियेत कोणत्याही पदाधिकारी/ अधिकारी यांचेकडून शिफारस/ दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्पावर सदर उमेदवारास अपात्र घोषित करून निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.

५. ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपुर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल. त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेऊन हजर राहणे बंधनकारक राहील. **कागदपत्र पडताळणीवेळी प्रोव्हीजनल प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद समजण्यात येईल.

६. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा व कागदपत्रे पडताळणीसाठी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

७. यापुर्वी बँकेकडे याच पदासाठी प्रत्यक्ष अथवा कागदोपत्री किंवा मेलद्वारे अर्ज केले असतील तर त्यांचे पुर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील.

८. वरील अटींमध्ये/ भरती प्रक्रियेत/ निवड कार्यपध्दतीत/ निकषांमध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तिक स्वरूपात कळविले जाणार नाही. झालेला बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील. यासाठी उमेदवारांनी संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देऊन दिलेल्या सुचनांचे अवलोकन करावे.

९. उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने ठाणे शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र परिक्षार्थींची संख्या विचारात घेऊन आवश्यकतेनूसार इतर शहरातील केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल. परिक्षार्थींची संख्या विचारात घेऊन आवश्यकतेनूसार एका पेक्षा अधिक सत्रामध्ये परिक्षा घेण्यात येईल.

१०. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परीक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लिकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यासंदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहिती ही बेकायदेशीर आहे असे समजण्यात यावे.

११. काही अपरिहार्य /आपत्कालीन /तांत्रिक कारणास्तव परिक्षा स्थगित करणे/ पुढे ढकलने, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

१२. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद/ तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

१३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतेवेळी उमेदवारांना कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.

**ड) ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-**

१. उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व Important Documents and Notifications / महत्वाची कागदपत्रे आणि सुचना वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करुन जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करुन ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर ऑनलाईन परिक्षा शुल्क भरावे.

   I. उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरुन स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

   II. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वत:ची पूर्ण माहिती बिनचूक भरावी.

२. नोकरभरतीच्या पदाकरीता बँकेच्या www.thanedistrictbank.com किंवा www.thanedccbank.com या अधिकृत संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी.व मोबाईल क्रमांक चुकीचा /अपुर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपुर्ण प्रकीये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रीयेदरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रक्रीयेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

३. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुक झाली किंवा त्रुटी राहील्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ.बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा. **व एकदा भरलेला ऑनलाईन अर्ज कोणत्याही स्तरावर दुरूस्त करता येणार नाही.**

४. उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या विहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या विहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रांची सखोल छाननी करण्यांत येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५. उमेदवारांना एका पदाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करुन निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.

६. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सुचना बँकेच्या www.thanedistrictbank.com किंवा www.thanedccbank.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दिनांक २९/०८/२०२५ रोजी सांयकाळी ५.०० पर्यंत उपलब्ध राहील.

७. ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम व अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाणार आहे. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. ऑनलाईन परिक्षा शुल्क दिनांक २९/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल. ऑनलाईन परिक्षा शुल्क भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

८. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत "JPEG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पांढ-या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वत: स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली "JPEG/PNG" प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करुन www.thanedistrictbank.com किंवा www.thanedccbank.com या संकेतस्थळावर सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली ईमेजची साईज 1MB असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 1 MB असावी **(त्यापेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही).**

९. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वत:चे आधार कार्ड "JPEG/PDF/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करुन thanedistrictbank.com किंवा thanedccbank.com या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 1 MB असावी.

१०. ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दिनांक २९/०८/२०२५ रोजी सांयकाळी ५.०० पर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

११. ऑनलाईन परिक्षेची माहिती उमेदवारांस ऑनलाईन फॉर्म भरतांना नोंदणी केलेल्या ई-मेल/SMS द्वारे कळविण्यात येईल. तसेच **ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सूचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यांत येणार नाही. सदर भरती प्रक्रीये दरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती**

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

**प्रक्रीयेची अद्यावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.** उमेदवारास परिक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

१२. राष्ट्रीयकृत/ व्यापारी/ खाजगी व सहकारी बँका आणि अन्य आर्थिक संस्थांमधून बडतर्फ/ निलंबित केलेले उमेदवार भरती प्रक्रियेसाठी पात्र असणार नाहीत. उमेदवारांनी ही माहिती बँकेस न देता भरती प्रक्रियेत सहभागी झाला आणि सदर बाब बँकेच्या निदर्शनास आल्यास भरती प्रक्रियेच्या कोण-याही टप्प्यावार अथवा बँकेमध्ये नियुक्ती झालेवरही उमेदवारास अपात्र करणेत येईल.

उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रीयेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यांत येईल व तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.

THE THANE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. Reg. No. 24917 Dt. 14-3-58

मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : १८/०८/२०२५
ठिकाण : ठाणे.